तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २१ मे २०२५

आतील पानावर

पान २– पूजा हेगडेच फिल्मी करिअर धोक्यात?
पान ३– मेधा शंकरची नव्या चित्रपटात वर्णी
पान ४– 'किंग'मध्ये पुन्हा ऑनस्क्रीन भावंडांच
पान ५– 'या' अभिनेत्रीनं नाकारली ३ कोटींची
पान ६– मला मराठीची ताकद दाखवायचीय!



## नंदमुरी बालकृष्णच्या सिनेमात विद्या बालन

दाक्षिणात्य सुपरस्टार नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापति श्रीनु यांचा चित्रपट 'अखंडा'च्या दुसर्या भागाची घोषणा करण्यात आली आहे. आता या चित्रपटात एका बॉलिवूड अभिनेत्रीची एंट्री झाली आहे. नंदमुरी बालकृष्ण सध्या 'अखंडा २- तांडवम'चे चित्रिकरण करत आहेत. बोयापति श्रीनु यांच्या दिग्दर्शनात हा चित्रपट तयार केला जात आहे. या चित्रपटात आता एका भूमिकेसाठी बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन हिची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटात ती एका राजकारण्याची भूमिका साकारणार आहे. बालकृष्ण यांच्यासोबतचा तिचा हा दुसरा चित्रपट असेल. यापूर्वी तिने एनटीआर यांच्या बायोपिकमध्ये त्यांच्यासोबत काम केले आहे. निर्मात्यांनी अखंडा २ चित्रपटाचे पोस्टर जारी केले आहे. हा चित्रपट पॅन इंडिया स्तरावर प्रदर्शित केला जाणार आहे. हा चित्रपट हिंदी, इंग्रजीसोबत अनेक भाषांमध्ये पाहता येणार आहे. चित्रपटात प्रज्ञा जैसवाल मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे. चित्रपटाची निर्मिती १४ रील्स प्लस बॅनर अंतर्गत राम अचंता आणि गोपीचंद अचंता यांनी केली आहे. चित्रपटाला थमन यांचे संगीत लाभले असून हा चित्रपट २५ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.



# श्रीकृष्णाच्या भूमिकेत झळकणार आमिर?




'द परफेक्शनिस्ट' अशी ओळख असलेला बॉलीवूड अभिनेता आमिर खान त्याच्या वैविध्यपूर्ण कलाकृतींसाठी ओळखला जातो. 'लगान', 'तारे जमीन पर', '३ इडियट्स', 'पी.के', 'दंगल' यांसारख्या वेगळेपण असलेल्या चित्रपटांतून त्यानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या सर्व चित्रपटांमध्ये त्यानं एकापेक्षा एक अशा भूमिका साकारल्या आहेत. अशातच आता आमिर खान लवकरच एका अनोख्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार असल्याचं म्हटलं जातंय. आमिर खान सध्या त्याचं ड्रीम प्रोजेक्ट 'महाभारत'वर काम करीत आहे. या चित्रपटाचं काम लवकरच सुरू होणार असून, आता नुकतंच आमिरनं 'महाभारत' या चित्रपटाबद्दल सांगितलं आहे. 'एबीपी लाइव्ह'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यानं सांगितलं, महाभारतावर आधारित चित्रपट बनवणं हे माझं स्वप्न आहे; पण हे खूप कठीण काम आहे. तर मागे एका मुलाखतीमध्ये त्यानं, या चित्रपटाचं लिखाण पूर्ण व्हायलाच दीड-दोन वर्षं लागतील. त्यानंतर चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होईल आणि या चित्रपटाचे काही भाग असतील. तसेच, यासाठी आम्हाला काही दिग्दर्शकांची मदत लागेल, असं म्हटलं होतं. या वेळीच त्याला 'महाभारत'मधील कोणतं पात्र साकारायला आवडेल असं विचारलं असताना त्यानं, मला श्रीकृष्णांचं पात्र साकारायला आवडेल. त्यांचा माझ्यावर खूप जास्त प्रभाव आहे. त्यामुळे जर कुठलं पात्र साकारायचं असेल, तर श्रीकृष्णांचं पात्र साकारायला मला नक्कीच आवडेल, असं म्हटलं आहे. परंतु, पुढे त्यानं याबाबत अजून कोणतीही अधिकृत घोषणा न झाल्याचं म्हटलं आहे. महाभारताचं महत्त्व मोठं असून या चित्रपटातून आपण जगाला दाखवून देऊ की आपल्याकडे काय आहे, असंही म्हटलं. दरम्यान, आमिर खाननं आजवर त्याच्या अभिनयानं अनेकांची मनं जिंकली आहेत.

# पूजा हेगडेचे फिल्मी करिअर धोक्यात?



मधुर दिग्दर्शक आशितोष गोवारीकर यांच्या मेगा बजेट मोहजो दारो या चित्रपटातून अभिनेत्री पूजा हेगडे हिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तिने अनेक बड्या स्टार्ससोबत चित्रपटांमध्ये अभिनय केला. आता पूजा हेगडे तिच्या आगामी है जवानी तो इश्क होना है या चित्रपटात दिसणार असल्याचे बोलले जात आहे. या चित्रपटात अभिनेता वरुण धवनची मुख्य भूमिका आहे. मात्र, या चित्रपटाची कोणतीही नवी अपडेट समोर आलेली नाही. या वर्षाच्या सुरुवातीला अभिनेता शाहिद कपूर आणि पूजा हेगडे हिची मुख्य भूमिका असलेला देवा चित्रपट रिलीज झाला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. यामुळे पूजाचा हिंदीतील सलग सहावा चित्रपट फ्लॉप ठरला आहे. यामुळे पूजा हेगडेच फिल्मी करिअर धोक्यात आल्याची चर्चा केली जात आहे. या वर्षी हिंदी आणि आता तमिळमध्ये सलग दोन फ्लॉप चित्रपट देणारी अभिनेत्री पूजा हेगडे तिच्या नवीन हिंदी चित्रपट 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटात दिसणार का याबद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे. 'रेट्रो' चित्रपटानंतर, तिच्याकडे 'जाना नायकन' हा चित्रपट आहे, जो तिचा सह-कलाकार विजयचा तमिळमधील शेवटचा चित्रपट असल्याचे म्हटले जात आहे.


# 'बॉर्डर २' मध्ये वरुण 'रिअल हीरो'च्या भुमिकेत



'बॉर्डर' हा चित्रपट आजही प्रेक्षक आवर्जून बघतात. ब्लॉकबस्टर अशा या चित्रपटाचा सिक्वल लवकरच येणार आहे. 'गदर २' च्या यशानंतर बॉलिवूड अभिनेता सनी देओलने 'बॉर्डर २' ची घोषणा केली होती. या चित्रपटाचा टीझरही प्रदर्शित झाला आहे, ज्यामुळे त्याच्या प्रदर्शनाची उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटात वरुण धवन आणि दिलजीत दोसांझसारखे अनेक स्टार दिसणार आहेत. यातच वरुण धवनच्या भूमिकेबाबत एक अपडेट आली आहे. वरुण धवन हा मेजर होशियार सिंग दहिया यांची भूमिका साकारत आहे. मेजर होशियार सिंग हे १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातील शौर्यवीर होते, ज्यांना त्यांच्या अद्वितीय पराक्रमासाठी मरणोत्तर 'परमवीर चक्र' प्रदान करण्यात आलं होतं. वरुण धवन या भूमिकेसाठी दोन महिने प्रचंड मेहनत घेत असल्याची माहिती आहे. वरुण धवनच्या व्यक्तिरेखेचा प्रवास हरियाणातील सिसना गावातून सुरू होतो आणि नंतर तो भारत-पाकिस्तान युद्धापर्यंत दाखवला जाणार आहे.

१९५७ मध्ये त्यांनी जाट रेजिमेंटमध्ये प्रवेश केला. त्यानंतर १९६५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध झालेल्या युद्धातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १७ डिसेंबर १९७१ मध्ये शंकरगड पठारावर बसंतर मोर्चा सांभाळताना दाखवलेले पराक्रम हे त्यांचे सर्वात मोठे योगदान ठरले. या मोहिमेदरम्यान २० पाकिस्तानी सैनिकांना त्यांनी बंदी बनवले आणि जारवाल गावावर यशस्वी ताबा मिळवला. १७ डिसेंबर १९७१ रोजी शत्रूच्या तीव्र हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले, तरीही त्यांनी लढा सुरुच ठेवला आणि पाकिस्तानच्या कमांडिंग ऑफिसरलाही ठार केलं. या अदम्य शौर्यासाठी त्यांना मरणोत्तर 'परमवीर चक्र' प्रदान करण्यात आलेलं आहे. हा भारतातील सर्वोच्च लष्करी पुरस्कार आहे, जो शत्रूच्या उपस्थितीत अत्यंत शौर्य किंवा आत्मत्यागासाठी दिला जातो.

# दादासाहेब फाळकेंवर येणार बायोपिक



भारतीय सिनेमाचे जनक मानले जाणारे दादासाहेब फाळके यांच्यावर आता बायोपिक येणार आहे आणि या ऐतिहासिक प्रकल्पामागे आहेत अभिनेता आमिर खान आणि दिग्गज दिग्दर्शक राजकुमार हिरानी ज्यांनी यापूर्वी '३ इडियट्स' आणि 'पीके' सारखे अविस्मरणीय सिनेमे दिले आहेत. भारत सरकारकडून दिला जाणारा सर्वात प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्यांच्या नावाने आहे, त्या व्यक्तिमत्वाची कथा आजपर्यंत हिंदी सिनेमात साकारण्यात आली नव्हती, ही बाबच आश्चर्यकारक होती. मात्र, आता ही सिनेमाच्या जन्माची कथा, सिनेमाच्या माध्यमातून मोठ्या पडद्यावर उलगडली जाणार आहे. हा चित्रपट स्वातंत्र्य संग्रामाच्या पार्श्वभूमीवर घडणारी एका कलाकाराची विलक्षण संघर्षमय कहाणी मांडणार आहे. ज्याने शून्यातून सुरुवात करून जगातील सर्वात मोठ्या स्थानिक चित्रपटसृष्टीची पायाभरणी केली. या चित्रपटाचे शूटिंग ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणार आहे. 'सितारे जमीन पर'च्या प्रदर्शना नंतर आमिर खान लवकरच या भूमिकेसाठी तयारी सुरू करणार आहेत. चित्रपटासाठी लॉस एंजलिसमधील व्हीएफएक्स स्टुडिओंनी त्या काळातील युगदर्शक डिझाइन्स आधीच एआयच्या साहाय्याने तयार केली आहेत. या चित्रपटाच्या लेखनावर राजकुमार हिरानी, अभिजात जोशी, हिंदुकुश भारद्वाज आणि अविष्कार भारद्वाज हे चार लेखक गेले चार वर्षे झाले काम करत आहेत. विशेष म्हणजे, दादासाहेब फाळके यांचे नातू चंद्रशेखर श्रीकृष्ण पुसळकर यांनी या प्रकल्पासाठी आपला पूर्ण पाठिंबा दिला असून त्यांनी त्यांच्या आजोबांच्या आयुष्यातील अनेक खास आठवणी आणि प्रसंग शेअर केले आहेत, जे पटकथेसाठी अत्यंत मौल्यवान ठरत आहेत. राजकुमार हिरानी आणि आमिर खान या दिग्गज जोडीकडून येणारा हा चित्रपट भारतीय मनोरंजनसृष्टीत एक वेगळा आणि उंच बेंचमार्क नक्कीच सेट करेल.

# मेधा शंकरची नव्या चित्रपटात वर्णी

'१२ फेल' या चित्रपटातून अभिनेत्री मेधा शंकर रातोरात स्टार झाली. आपल्या करिअरमधील पहिल्याच चित्रपटातून तिने प्रचंड लोकप्रियता मिळवली. '१२ फेल' नंतर आता मेधा लवकरच नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचं नाव 'गिन्नी वेड्स सनी-२' असं आहे. अभिनेता विक्रांत मेस्सी आणि यामी गौतम यांची प्रमुख भूमिका असलेला 'गिन्नी वेड्स सनी' हा चित्रपट २०२० मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. याचं दिग्दर्शन पुनीत खन्ना यांनी केलं होतं. त्यात आता निर्मात्यांनी या चित्रपटासंबंधित मोठी घोषणा केली आहे. जवळपास ५ वर्षांनंतर 'गिन्नी वेड्स सनी' चित्रपटाचा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यासोबतच चित्रपटातील स्टारकास्ट देखील फायनल करण्यात आली आहे. 'गिन्नी वेड्स सनी' या रोमकॉम चित्रपटाच्या पहिल्या भागात विक्रांत मेस्सी आणि यामी गौतमची जोडी पाहायला मिळाली. परंतु गिन्नी वेड्स सनीच्या सीक्वलमधून विक्रांत आणि यामीचा पत्ता कट करण्यात आला आहे. या सीक्वलमध्ये '१२ फेल' फेम अभिनेत्री मेधा शंकरची वर्णी लागली आहे. मेधा या चित्रपटात अभिनेता अविनाश तिवारीसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांना या चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, 'गिन्नी वेड्स सनी' दिग्दर्शनाची धुरा प्रशांत झा यांनी सांभाळली आहे. त्यासोबत चित्रपटाचं लेखन देखील त्यांनी केलं आहे. विनोद बच्चन यांच्या सौंदर्या प्रॉडक्शनच्या बॅनरखाली हा चित्रपट तयार होत आहे. या रोमकॉम चित्रपटाचं शूटिंग उत्तराखंडमध्ये सुरू करण्यात आलं आहे. परंतु चित्रपटाच्या रिलीज डेटबद्दल कोणताही अपडेट देण्यात आलेली नाही.






# श्रद्धा कपूरने वाढवले मानधन

बॉलिवूड

बॉलीवूड स्टार श्रद्धा कपूर ही इंडस्ट्रीतील सर्वात प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. तिचा शेवटचा चित्रपट 'स्त्री २' प्रचंड हिट झाला आणि तिच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. या चित्रपटाने विक्रमी कमाई केली होती. अलीकडेच बातमी आली की, एकता कपूरने तिच्या एका चित्रपटात श्रद्धाला कास्ट केले आहे. श्रद्धाने या चित्रपटासाठी तिचे मानधन वाढवल्याचेही बोलले जात आहे. एकता कपूरच्या या चित्रपटासाठी श्रद्धाला १७ कोटी रुपये मानधन मिळाले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील महिला अभिनेत्रीला मिळालेले हे सर्वाधिक मानधन आहे. चित्रपटाचे नाव अद्याप जाहीर झालेले नाही. हा चित्रपट सध्या प्री-प्रॉडक्शन टप्प्यात आहे आणि या वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत चित्रपट फ्लोरवर जाईल. रिपोर्टसनुसार, श्रद्धाने 'स्त्री २'साठी पाच कोटी रुपये घेतले होते. आता श्रद्धाने तिचे मानधन वाढवून ते थेट १७ कोटी रुपये केले आहे. 'स्त्री २'नंतर श्रद्धाचा हा मोठा प्रोजेक्ट आहे. श्रद्धा कपूर आता आलिया भट्ट आणि कियारा अडवाणीनंतर सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींच्या यादीत सामील झाली आहे. श्रद्धा 'स्त्री ३'मध्येही काम करणार आहे. हा चित्रपट ऑगस्ट २०२७ मध्ये प्रदर्शित होणार आहे. श्रद्धा कपूरने '३ पत्ती' या चित्रपटातून पदार्पण केले होते. यानंतर ती 'लव्ह का द एंड'मध्ये दिसली. तिने 'आशिकी २', 'गोरी तेरे प्यार में', 'एक व्हिलन', 'हैदर', 'उंगली', 'एबीसीडी २', 'बागी', 'फ्लाइंग जट', 'रॉक ऑन २', 'हाफ गर्लफ्रेंड', 'साहो', 'छिछोरे', 'बागी ३', 'तू झुठी में मक्कार' यांसारखे चित्रपट केले आहेत.



# 'किंग'मध्ये पुन्हा ऑनस्क्रीन भावंडांच त्रिकूट परतणार?

अभिनेता शाहरुख खान त्याच्या किंग चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाविषयीच्या नव्या अपडेट समोर येत असून आता आणखी एक अपडेट समोर आली आहे. किंग चित्रपटात आता ज्येष्ठ अभिनेता अनिल कपूरची एन्ट्री झाली असून जॅकी श्रॉफ देखील या चित्रपटाचा भाग असणार असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे आता चित्रपटाच्या शुटिंगला लवकरच सुरूवात होणार असून कास्टिंगची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पुन्हा एकदा त्रिमूर्ती किंग चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिद्धार्थ आनंद या चित्रपटाते दिग्दर्शन करणार असून अभिषेक बच्चन, दीपिका पदुकोण यांच्यासह इतरही अनेक कलारांच्या महत्वाच्या भूमिका असणार आहेत. शाहरुखची मुलगी सुहाना ही पहिल्यांदाच त्याच्यासोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या चित्रपटात एकमागून एक अनेक कलाकारांची एन्ट्री होत आहे. दीपिका पादुकोणनंतर अनिल कपूर आणि त्यांचे ऑनस्क्रीन मोठा भाऊ अर्थात जॅकी श्रॉफची एन्ट्री होणार आहे. मात्र, जॅकीकडून याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्याची किंगमध्ये एन्ट्री होणार का? हे पाहावे लागणर आहे. वॉर आणि पठाण या चित्रपटांचे दिग्दर्शक करणारे सिद्धार्थ आनंद हे किंगचे दिग्दर्शन करणार असून २० मे पासून चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात होणार आहे. अभिनेता अभिषेक बच्चन खलनायकाची भूमिका चित्रपटात साकारणार आहे. तर अनिल कपूरचही लक्षवेधी भूमिका असणार आहे. त्रिमूर्ती या चित्रपटानंतर तब्बल ३० वर्षांनी खान-कपूर-श्रॉफ ही जोडी पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे किंगची मोठी उत्सुकता प्रेक्षकांना लागलेली आहे.

# काम मिळत नव्हतं म्हणून केला बोल्ड सिनेमा

सिनेमा, वेबसीरिजमध्ये बोल्ड, इंटिमेट सीन्स असणं आता फार आश्चर्याचं राहिलेलं नाही. ओटीटीवर तर सर्रास बोल्ड सीन्सचा भडिमार असतो. मात्र अनेक कलाकार काही वेळेस नाईलाजानेही असे सीन्स देतात. अभिनेत्री पत्रलेखाने नुकताच याचा खुलासा केला आहे. तिने करिअरच्या सुरुवातीला 'लव गेम्स' या सिनेमात बोल्ड सीन्स दिले होते ज्याची चर्चा झाली होती. आता पत्रलेखाने त्या सिनेमात काम करणं ही मोठी चूक असल्याचं मान्य केलं आहे. आता ती तसे सीन्स करु शकणार नाही असंही म्हणाली. एका मुलाखतीत बोलताना पत्रलेखा म्हणाली, नाही, मी पुन्हा तसे सीन आता देऊ शकत नाही. १० वर्षांपूर्वी जी पत्रलेखा होती ती खूप वेगळी होती. तेव्हा माझं वयही कमी होतं. तेव्हा माझ्यासाठी काम मिळणं महत्वाचं होतं. मी तेव्हा काम मिळवण्यासाठी खूप अस्वस्थ असायचे. अशा मानसिकतेतच मी तो सिनेमा केला. तेव्हा मला याची जाणीव झाली नाही. त्या सिनेमात काहीही चुकीचं नव्हतं. जे स्क्रिप्टमध्ये होतं तेच तसाच सिनेमा बनवण्यात आला. पण मी तेव्हा सिनेमाला न्याय देऊ शकले का? तर नाही. मी सिनेमासाठी योग्य व्यक्ती नव्हते. माझ्याकडून ती चूक झाली. सिनेमा हातातून जाईल म्हणून यात काम करायचं हे अयोग्य होतं याचा मी विचार करायला हवा होता. पण हेही तितकंच खरं आहे की माझ्याजवळ काम नव्हतं. त्यामुळे मी स्वत:ला जास्त दोष देणार नाही.






# 'सितारे जमीन पर'मध्ये हा अभिनेता नव्या भूमिकेत

बॉलीवूड अभिनेता आमिर खान सध्या त्याच्या आगामी 'सितारे जमीन पर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा चित्रपट २००७ साली रिलीज झालेल्या 'तारे जमीन पर' चित्रपटाचा सीक्वल आहे. नुकतेच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. आमिर खान आपल्या 'सितारे जमीन पर' या चित्रपटासह १८ वर्षांनंतर पुन्हा एकदा तीच जादू प्रेक्षकांच्या भेटीस घेऊन येणार आहे. 'सितारे जमीन पर'चा ट्रेलर आपलेपणा आणि आनंदाने भरलेला आहे. यात प्रेम, हास्य आणि भावनिक क्षणांचा अचूक समतोल आहे. या हृदयस्पर्शी विनोदी चित्रपटात असे अनेक प्रसंग आहेत, जे हसवण्याबरोबरच हृदयाला स्पर्श करतात. ट्रेलरमध्ये आमिर खान एका बास्केटबॉल कोचच्या भूमिकेत दिसत आहे. जो दिव्यांग मुलांना बास्केटबॉल शिकवत आहे. 'सितारे जमीन पर'च्या ट्रेलरला एक हटके कॅप्शन देत, १ टिंगू बास्केटबॉल प्रशिक्षक, १० तुफानी सितारे आणि त्यांचा प्रवास असे लिहिले आहे. या चित्रपटाची टॅगलाईन सबका अपना अपना नॉर्मल अशी आहे. जो सर्वांना स्वीकारण्याचा आणि समावेशकतेचा संदेश देते. या चित्रपटाचे दिग्दर्शन आर. एस. प्रसन्ना यांनी केले आहे, ज्यांनी यापूर्वी 'शुभ मंगल सावधान' सारखा उत्कृष्ट चित्रपट बनवला आहे. 'सितारे जमीन पर' हे त्यांच्या करिअरमधील सर्वात मोठे प्रोजेक्ट आहे, ज्यामध्ये आमिर खान पुन्हा एकदा आपल्या दमदार अंदाजात दिसणार आहे. 'सितारे जमीन पर' चे निर्मिती आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली झाले आहे, जो भारतातील सर्वात यशस्वी प्रोडक्शन हाऊसपैकी एक आहे. या बॅनरने 'लापता लेडीज', 'दंगल', 'तारे जमीन पर', 'सीक्रेट सुपरस्टार', 'लगान' यांसारखे अनेक उत्कृष्ट आणि अविस्मरणीय चित्रपट दिले आहेत. आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली बनलेल्या 'सितारे जमीन पर' मध्ये आमिर खान आणि जिनेलिया देशमुख मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय यात अरूष दत्ता, गोपी कृष्ण वर्मा, संवित देसाई, वेदांत शर्मा, आयुष भंसाली, आशीष पेंडसे, ऋषी शहानी, ऋषभ जैन, नमन मिश्रा आणि सिमरन मंगेशकर या नव्या कलाकारांचाही समावेश आहे.

# अल्लू अर्जुन आणि ॲटलीच्या नव्या सिनेमाची घोषणा

'स्टायलिश स्टार' अल्लू अर्जुन हा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांमध्ये गणला जातो. अलिकडेच प्रदर्शित झालेला त्याचा 'पुष्पा २: द रूल' हा चित्रपट प्रचंड गाजला. या चित्रपटाने जुने रेकॉर्ड तर मोडलेच पण यासोबतच नवे रेकॉर्ड रचलेत. 'पुष्पा २: द रूल' हा भारतात सर्वात जास्त कमाई करणारा चित्रपट ठरला. आता 'पुष्पा २: द रूल' अल्लू अर्जुन कोणत्या भूमिकेत दिसणार याची सर्वांना उत्सुकता आहे.

अल्लू अर्जुनच्या आगामी प्रोजेक्टची माहिती समोर आली आहे. अल्लू अर्जुन पुन्हा एकदा चित्रपटसृष्टीत आग लावण्यास सज्ज झाला आहे. आज अल्लू अर्जुनचा ४३ वा वाढदिवस आहे. या खास प्रसंगी, अभिनेत्याने त्याच्या चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. अल्लू अर्जुनच्या वाढदिवशी त्याच्या नवीन चित्रपटाची घोषणा करण्यात केली आहे. अभिनेत्याचा हा चित्रपट ॲटली कुमार दिग्दर्शित करणार आहे. गेल्या बऱ्याच काळापासून या चित्रपटाची चर्चा सुरू होती. पण, आता निर्मात्यांनी अधिकृत घोषणा केली आहे. प्रॉडक्शन हाऊस सन पिक्चर्सने द वर व्हिडिओ शेअर करून याबद्दल माहिती दिली. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहलं, एका ऐतिहासिक सिनेमॅटिक कार्यक्रमासाठी सज्ज व्हा. व्हिडिओमध्ये अल्लू अर्जुन चेन्नईतील प्रॉडक्शन हाऊसच्या ऑफिसकडे जाताना दिसतो, जिथे तो दिग्दर्शक ॲटली आणि निर्माते कलानिधी मारन यांना भेटतो. हे तिघेही प्रकल्पावर चर्चा करताना आणि प्रोजेक्ट अधिकृतपणे लॉक करताना दिसतात. यानंतर व्हिडीओमध्ये थेट लॉस एंजेलिसमधील व्हीएफएक्स स्टुडिओला दिलेली भेट दाखवण्यात आली आहे. यामध्ये अल्लू अर्जुन आणि ॲटली हे हॉलिवूडमधील अनेक प्रसिद्ध तांत्रिक तज्ञांच्या मदतीने पटकथेवर काम करताना दिसून आले. यामध्ये आयर्नहेड स्टुडिओचे सीईओ आणि कला दिग्दर्शक जोस फर्नांडिस यांचा समावेश आहे, जे स्पायडर-मॅन: होमकमिंग, कॅप्टन अमेरिका: सिव्हिल वॉर आणि ॲव्हेंजर्स: एज ऑफ अल्ट्रॉन या चित्रपटांसाठी ओळखले जातात. चित्रपटाबद्दल आपला उत्साह व्यक्त करताना ॲटली म्हणाला, हा असा चित्रपट आहे जो मी नेहमीच बनवण्याचे स्वप्न पाहत होतो. या स्क्रिप्टला साकारण्यासाठी वर्षानुवर्षे लागली. आता सन पिक्चर्समधील कलानिधी मारन सरांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आयकॉन स्टार अल्लू अर्जुन सर यांच्यासोबत ते प्रत्यक्षात आणणे हे एखादे स्वप्न पूर्ण होण्यापेक्षा कमी नाही. हा चित्रपट मुळातच भव्य आहे आणि त्याची कथा जादुई आहे.

चित्रपटाचं नाव समोर आलेलं नाही. पण, सध्या ए २२ ए ६ असं तात्पुरते नावं या प्रोजेक्टला देण्यात आलेलं आहे. हा अल्लू अर्जुनचा २२ वा आणि ॲटलीचा सहावा चित्रपट आहे.





# रामचरण स्वतःला खोलीत कोंडून घ्यायचे

राम चरण हा दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील आघाडीतील अभिनेत्यांपैकी एक आहे. राम चरण हा श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक आहे. मात्र, राम चरणची पत्नी उपासना ही एक मोठा व्यवसाय सांभाळत आहे. उपासना ही अपोलो हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. प्रताप सी. रेड्डी यांची नात आहे. उपासना हिने अलीकडेच नैराश्याचा सामना केल्याचा खुलासा केला. शारीरिक आणि भावनिक आरोग्यावर नियंत्रण मिळवणे ही तिची सर्वात मोठी कामगिरी असल्याचं तिनं सांगितलं. कंटेंट क्रिएटर मासूम मीनावाला यांच्याशी झालेल्या संभाषणात उपासनाने अनेक वैयक्तिक गोष्टींचा खुलासा केला. उपासना म्हणाली, मी स्वतःला खोलीत बंद करून घ्यायचे. तणाव आला की जास्त जेवण करायचे. पण, आता मी निरोगी सवयी विकसित केल्या आहेत आणि तणावाचा सामना करण्याचे चांगले मार्ग शोधले आहेत. आज मला हे सांगताना खूप अभिमान वाटतो की मी माझं शरीरावर नियंत्रण आहे. पुढे ती म्हणाली, मला वाटतं की योग्य दिनचर्या अवलंबल्यानं खूप मदत झाली. यामुळं आयुष्यात संतुलन आलं. राम चरण आणि उपासना यांची प्रेमकथा खूप खास आहे. दोघांची पहिली भेट कॉलेजमध्ये झाली. दोघेही कॉलेजमध्ये चांगले मित्र होते, पण मैत्रीपूर्वी त्यांच्यात खूप भांडण व्हायची. त्यानंतर दोघेही पक्के मित्र बनले. राम चरण शिकण्यासाठी परदेशात गेल्यावर दोघांनाही त्यांच्या प्रेमाची जाणीव झाली. दोघेही एकमेकांना खूप मिस करत होते. यानंतर दोघांनी डेट करायला सुरुवात केली. यानंतर दोघांनी २०११ मध्ये साखरपुडा केला. २०१२ मध्ये त्यांचे लग्न झाले. लग्नाच्या बऱ्याच वर्षानंतर ते २०२३ मध्ये मुलीचे पालक झाले.



# 'या' अभिनेत्रीनं नाकारली ३ कोटींची जाहिरात

साऊथ अभिनेत्री साई पल्लवी सिनेइंडस्ट्रीतील यशस्वी अभिनेत्रींपैकी एक आहे. ९ मे, १९९२ साली जन्मलेली साई पल्लवी अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी डॉक्टर होती. तिला नॅचरल ब्युटी म्हटलं जातं. अभिनेत्रीने एका फेयरनेस क्रिमच्या जाहिरातीला नकार दिला होता. साई पल्लवी बेधडक विधानांमुळे चर्चेत येत असते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, साई पल्लवी हिला २०१९ साली एका फेअरनेस क्रीमच्या जाहिरातीची ऑफर मिळाली होती. ज्यासाठी तिला २-३ कोटी रुपये मानधन मिळणार होते. पण अभिनेत्रीने ही जाहिरात नाकारली आणि अशा प्रकारच्या कोणत्याच गोष्टींचं प्रमोशन करणार नसल्याचे म्हटले. एका मुलाखतीत साई पल्लवीने खुलासा केला होता की, तिला जास्त मेकअप करायला आवडत नाही. तिचं म्हणणं आहे की, ती भारतीय आहे आणि तिला जो रंग मिळाला आहे, तो योग्य आहे. सोशल मीडियावर तिच्या या निर्णयाचं खूप कौतुक झाले होते आणि नेटकर्यांनी तिच्या या निर्णयाला सर्वोत्तम निर्णय म्हटलं होतं. साई पल्लवीच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर २००५ साली तिने 'कस्तुरी मान' सिनेमातून पदार्पण केले होते. त्यानंतर तिने कधीच मागे वळून पाहिले नाही. यानंतर साई पल्लवी काली, मिडिल क्लास, मारी, लव स्टोरी, श्याम सिंह रॉय, गार्गी, अमरन, तंडेल यासारख्या सिनेमात झळकली आहे. आगामी प्रोजेक्टबद्दल सांगायचं झालं तर साई पल्लवी लवकरच नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' सिनेमात झळकणार आहे. यात ती सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. 'रामायण' सिनेमात साई पल्लवीसोबत रणबीर कपूर रामच्या भूमिकेत दिसणार आहे. तर केजीएफ स्टार यश रावणाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे.



# मला मराठीची ताकद दाखवायचीय!

महेश मांजरेकर हे फक्त दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय नाहीत. तर त्यांनी साकारलेल्या अनेक भूमिका गाजल्या आहेत. हिंदीसह त्यांनी मराठी चित्रपटांतदेखील काम केले आहे. काही दिवसांपूर्वीच म्हणजेच १ मे २०२५ ला महेश मांजरेकर यांनी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटाची घोषणा केली आहे. अभिनेता सिद्धार्थ बोडके या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. तर बालकलाकार त्रिशा ठोसरही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. आता प्रेक्षकांना हा चित्रपटाबद्दल उत्सुकता लागून राहिली आहे. महेश मांजरेकर यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी मराठीची ताकद दाखवायची आहे, असे वक्तव्य केले आहे. महेश मांजरेकर म्हणाले, आपल्याला मराठीची एकच ताकद दाखवायची आहे. या वर्षी मला मराठीची ताकद दाखवायची आहे. दाक्षिणात्य चित्रपटांची ताकद बस झालं. त्यात वाईट काही नाहीये. पण, त्यांनी ताकद दाखवली. आता मला मराठीचा एकच दणका द्यायचा आहे. कारण- महाराष्ट्र हा मोठा प्रदेश आहे. छावा नावाच्या सिनेमाला ८० टक्के बिझनेस महाराष्ट्राने दिला आहे. महाराष्ट्राने ताकद दाखवली. आता ती मराठी सिनेमातून दाखवायची आहे. महेश मांजरेकर यांनी असेही सांगितले की, मी या वर्षी मणिरत्नम, रजनीकांत, कमल हासन यांच्याबरोबर काम केले आहे. तसेच, एका पंजाबी चित्रपटात काम केले आहे. दरम्यान, काही दिवसांपासून मराठी सिनेमांकडे प्रेक्षक पाठ फिरवीत असल्याचे वक्तव्य अनेक कलाकार, निर्माते व दिग्दर्शकांनी केले आहे. बॉलीवूडच्या मोजक्या चित्रपटांना प्रेक्षक गर्दी करताना दिसतात. आता महेश मांजरेकर दिग्दर्शित चित्रपट हे चित्र बदलू शकेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. काही दिवसांपूर्वीच महेश मांजरेकरांनी लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत नटसम्राट चित्रपटात नाना पाटेकर व विक्रम गोखले यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला होता. जेव्हा महेश मांजरेकर हे नाना पाटेकर यांच्याबरोबर काम करणार आहेत, हे इंडस्ट्रीमधील व चित्रपटसृष्टी बाहेरील लोकांना समजले तेव्हा हा चित्रपट पूर्ण होणार नाही, असे अनेकांनी सांगितले. मात्र, महेश मांजरेकरांनी हा चित्रपट करायचे ठरवले.

# विजय निकम झाले 'टायगर भाई'

अभिनेते विजय निकम यांनी आजवर वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. त्यांच्या नव्या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. चर्चेचे कारणही तसंच आहे. 'वीजी फिल्म्स'च्या 'आतली बातमी फुटली' चित्रपटात एका भाईची भूमिका ते साकारणार आहेत. 'टायगरभाई' असं त्यांच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार यांचा 'आतली बातमी फुटली' हा नवाकोरा मराठी चित्रपट ६ जूनला प्रदर्शित होणार आहे. मी साकारलेला 'टायगरभाई' हा चित्रपटात खूपच धमाल करताना दिसणार आहे. भूमिका ग्रे शेडची असली तरी माझ्या आजवरच्या भूमिकांपेक्षा वेगळी आहे सोबत त्यात विनोदी बाज असल्याने ही भूमिका करायला मजा आली. मला 'टायगरभाई' च्या भूमिकेत पाहणं चाहत्यांना सुद्धा आवडेल यात शंका नाही. एका खूनाच्या सुपारीच्या रहस्यभेदा भोवती 'आतली बातमी फुटली' या सिनेमाची कथा फिरते. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, पॉवरपॅक्ड अभिनेता सिद्धार्थ जाधव, विजय निकम, भारत गणेशपुरे, आनंदा कारेकर, प्रीतम कागणे, त्रिशा ठोसर आदि कलाकार या चित्रपटात धमाल उडवणार आहेत. 'आतली बातमी फुटली' या चित्रपटाची निर्मिती विशाल पी.गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सह निर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तर संकलन रवी चौहान यांचे आहे. संगीत एग्रेल रोमन यांनी दिले आहे. कथा जैनेश इजरदार यांनी तर पटकथा जीवक मुनतोडे, अम्मन अडवाणी, जैनेश इजरदार, विशाल पी. गांधी यांची आहे. संवाद लेखन जीवक मुनतोडे, व अद्वैत करंबेळकर यांनी केले आहेत. वेशभूषा ग्रीष्मा अडवाणी यांची, नृत्यदिग्दर्शन राहुल ठोंबरे, तिजो जॉर्ज यांचे आहे. प्रॉडक्शन डिझायनर रवी नाईक आहेत. कास्टिंग दिग्दर्शन जोकीम थोरास यांनी केले आहे, तर कार्यकारी निर्माते अब्दुल खान आहेत. फिल्मास्त्र स्टुडिओजने या चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी सांभाळली आहे.



# पल्लवी जोशी झळकणार 'तन्वी द ग्रेट' चित्रपटात

पल्लवी जोशी या भारतीय सिनेमातील सर्वात प्रतिष्ठित अभिनेत्री आणि निर्मात्यांपैकी एक आहेत. त्यांच्या ५० वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी करिअरमध्ये त्यांनी टेलिव्हिजनपासून चित्रपटांपर्यंत विविध माध्यमांतून काम केलं आहे आणि आज त्या एक प्रभावशाली चित्रपट निर्मात्या म्हणून ओळखल्या जातात. आपल्या भूमिकांमधील सखोल समज आणि प्रभावी सादरीकरणासाठी पल्लवी जोशी यांना ओळखले जाते. त्या प्रत्येक पात्रात एक वेगळी छाप सोडतात. 'द काश्मीर फाईल्स' आणि 'द व्हॅक्सिन वॉर'सारख्या चित्रपटांमधून भरघोस यश मिळवल्यानंतर पल्लवी जोशी आता त्यांच्या आगामी चित्रपट 'तन्वी द ग्रेट' मधून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवरून पल्लवी जोशी यांचा कॅरेक्टर पोस्टर शेअर केला आहे, ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या भूमिकेचा परिचय दिला.



# रेशमी स्वरांचा सुरांचा बादशाहः तलत मेहमूद

**दिलमे समा गये सजन । फूल खिले चमन चमन ।। या ओळी दोन हृदयाच्या मिलनामधला सेतू आहे. हृदय व मन मिलनाचा संकेत आहे. तलत व लता यांनी भावभावनांचे हे अद्भुत मिश्रण आपल्या स्वर्गीय आवाजात सज्जाद हुसेन या महान संगीतकाराच्या तालमीत, १९५२ सालच्या 'संगदील' चित्रपटासाठी गाऊन अजरामर केले.**

तसं ये हवा ये रात ये चांदणी। तेरी एक अदा पे निसार है।। प्रीतीचे क्षण अनुभवताना साक्षीला असलेला निसर्ग ही तुझ्या एकेक नजाकतीवर खूश आहे. मग मला तुझी अभिलाषा का असणार नाही? वरील चित्रपटातील या गाण्यात तलत आपल्या प्रेयसीच्या वैशिष्ट्याचे, तिच्या प्रेमभर्या नजरेचे, तिच्या बोलण्यातील लाघवाचे वर्णन मधूर स्वरात करतो. तेव्हा हे केवळ सिनेमातील गाणे उरत नाही तर प्रत्यक्ष प्रेमाचे सादरीकरण ठरते. तलत मेहमूदला 'गलत मेहमूद' म्हणणारे दिग्गज संगीतकार सज्जाद हुसेनलाही या गाण्यांसाठी तलतशिवाय दुसरा पर्याय सापडला नाही. अर्थात तो त्यांचा अधिकार होता.

१९५१ सालच्या 'तराना' चित्रपटात नायक दिलीपकुमार आजारी अवस्थेत हतबल होऊन प्रेयसीला आपला नाईलाज तलतच्या मुलायम आवाजात प्रकट करतो. दो चार कदम जब मंझिल थी । किस्मत ने ठोकर खायी है।। प्रेमाची इतिश्री होणार या भावना व्यथित होऊन कथित करतो. नायिका मधुबाला पण व्यथितपणे लताच्या आर्त आवाजात आपले दुःख प्रकट करते. कुछ आख मे आंसू बाकी है। जो मेरे गमके साथी है।। स्वरकोकिळा व तलत यांचा तत्कालीन मधूर स्वर प्रेमधवन या गीतकाराच्या शब्दांना किती न्याय देतो, हे गाणे ऐकतानाच समजते. मधूर घराण्याचे संगीतकार अनिल विश्वास यांचा हा मधूर आविष्कार. तलत व लताने ज्या सोज्वळतेने गायले तेवढ्याच पवित्र भावनेने दिलीप व मधुबालाने पडद्यावर अभिनित करून प्रेमाचे पावित्र्य राखले. अनिल विश्वास तलतचे गुरू होते. त्या काळात कुंदनलाल सैगल या महान गायकाचा बोलबाला होता. त्याच्या लकबीत गाण्याचा प्रयत्न नवोदित गायक रफी, मुकेश, तलत करीत. अनिलजींनी तलतला समजावले की, तुझ्या गळ्यातील कंपने हे तुझे वैशिष्ट्य आहे. कंपीत स्वरात गाऊनही सूर न सोडता गातो, ही तुला ईश्वरी देणगी आहे. ते सोडून गाऊ नको व कुणाची नक्कल करू नको. मला आठवते, १९९८ साली एका आठवड्यात दूरदर्शनवर हिंदी सारेगमप या कार्यक्रमात अनिल विश्वास आले होते. त्या काळात तलत मेहमूदची तब्येत अत्यवस्थ होती. तलतचा फोटो स्टेजवरील टेबलवर ठेवून, त्यांची तब्येत लवकर सुधारण्यासाठी सर्व रसिकांनी ईश्वराला प्रार्थना करावी, अशी विनवणी त्यांनी केली. ते तलतवर पित्यासारखे प्रेम करायचे. चित्रपटसृष्टीत आजवर तलतच्या आवाजासारखा दुसरा गायक झाला नाही. १९५० साली 'आरजू' चित्रपटात त्यांनी तलतला सर्वप्रथम आपल्या संगीतात संधी दिली.



ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल जहाँ कोई ना हो वैफल्यग्रस्त अवस्थेत जगाबद्दल तिटकारा आल्यावर कुठेतरी दूर एकांतात जान्याची मनीषा तलतने आर्ततेने प्रकट केली. तलत मेहमूदची गाणी म्हणजे गप्पांच्या मैफिलीत टाईमपास म्हणून ऐकण्याची गाणी नाहीत. डोळे मिटून शांत व एकाग्र चित्ताने श्रवण केलीत तर ते कवीच्या शब्दांना कशी वाचा फोडतो, शब्द कसे बोलके करतो व रेशमी स्वर अलगद घोळून शब्दांना कसे भावगरभीत करतो, याचा प्रत्यय येतो. वैयक्तिक जीवनात मिश्कील असणारा तलत गायकीत मुश्कील होता. संगीतकार गुलाम हुसेनच्या 'दिल-ए-नादान' चित्रपटात अशाच एका शोकान्त नायकाची व्यथा ते स्वरातून प्रसवतात. प्रेमात धोका झाल्यावर होरपळलेल्या मनाची उद्विग्नता मांडताना प्रत्यक्ष ईश्वराला दोषी ठरवितात.


आजच्या पिढीला तलत माहिती असण्याचे कारण नाही. परंतु माझ्यासारख्याने लिहिलेली माहिती वाचल्यावर माझ्या पिढीतील काही रसिक आपला स्टेट्स सिम्बॉल वाढविण्याकरिता म्हणतात, अरे वा! तलत ना! काय गात होता!! निव्वळ सोशल स्टेट्स वाढविण्याची धडपड! २४ फेब्रुवारी १९२४ रोजी लखनौ येथे हलाखीचे जीवन जगत असलेल्या कुटुंबात जन्म झालेले तलत मेहमूद १६ व्या वर्षी गायन क्षेत्रात आले. लखनौ आकाशवाणीवर गालिब, दाग, जिगरच्या गझला गाऊन प्रसिद्धीला आले. १९४४ साली कोलकाता येथे येऊन 'सब दिन एक समान नही है ' व 'तस्वीर तेरी, दिल मेरा बहेलाना सकेंगी' ही गैरफिल्मी गाणी ध्वनिमुद्रित झाली. तलत आपल्या स्टेज शोची सुरुवात 'तस्वीर तेरी दिल... ' या गाण्यानेच करायचे व नमनालाच टाळी घ्यायचे. गायकीची संधी मिळाली तसेच आठ-नऊ हिंदी चित्रपटात अभिनेता बनता आले. आराम (१९५१), दिल-ए- नादान (१९५३), मिर्झा गालिब (१९५४), डाकबाबू (१९५४), वारीस (१९५४), रफ्तार (१९५५), एक गाव की कहाणी (१९५५), लालरुख (१९५८), मालिक (१९५८), सोने की चिडियाँ (१९५८). यातील काही चित्रपटात त्यांना नायकाची भूमिका मिळाली. तलत मेहमूद यांनी हिंदी, उर्दू, पंजाबी, सिंधी तसेच मराठीतही गाणी गायलीत.

'हसले आधी कुणी? तू का मी' (मोलकरीण) या मराठी चित्रपटात वसंत देसाई यांनी आशा भोसलेंसोबत या युगल गीतासाठी संधी दिली. 'यश हे अमृत झाले, सुख स्वर्गीचे आले.' (पुत्र व्हावा ऐसा) या चित्रपटात संगीतकार वसंत प्रभू यांनीतलतकडून हे गाणे गाऊन घेतले व मराठीला एका सिल्की गाण्याची भेट दिली. फिर वही श्याम वही गम वही तन हाई, तेरी आंख की आंसू पी जाऊ, मै तेरी नजरका सुरूर हुं, ऐ सनम आज ये कसम खाये (तलत व लता). तलतने गैरफिल्मी गाणी व गझला भरपूर म्हटल्या आहेत. देश-विदेशात शेकडोंनी स्टेज शो केलेत. गैरफिल्मी २०० व जवळपास ५००० फिल्मी गाणी गायलीत. थोड्या उडत्या आवाजातलल्या मधूर गाण्यांवर रसिकांनी दाद दिली आहे. गझल या अर्थप्रधान काव्य प्रकाराला चित्रपटात स्वतःच्या स्वरांनी सोन्याच्या पालखीत बसविले व दर्जा वाढविला. म्हणून त्याला गझल सम्राट, शहेनशा-ए-गझल असेही म्हणत. एखाद्या निर्जन ठिकाणी जाऊन तलतची गाणी ऐकताना स्वर्गीय आनंद मिळतो. त्याच्या मुलायम रेशमी स्वरातील करामतीने मन भारावून जाते. स्वरांच्या शब्दानुरूप बारीक बदलावामुळे तो शब्द जिवंत होतो. एखादा स्वर चपखलपणे अंत:करणात असा भिडतो की, मुखातून 'वाहवा! वाहवा!!' हेच उद्गार निघतात.

तलत मेहमूद यांना १९९२ साली भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरविले होते. गीतकाराच्या काव्याला आपल्या रेशमी स्वरांच्या बाहुपाशात घेऊन नि:संकोचपणे समर्पण करणार्या या रेशमी स्वरांचा सम्राटाचे स्वर ९ मे १९९८ रोजी मुंबई येथे अबोल झाले ते नेहमीसाठी. जी सकेंगे न हम तुझसे होके जुदा जा मेरी जिंदगी,तेरा हाफिज खुदा चल दिया कारवा...

**रमेश पोफळी**

# 'महावतार नृसिंह'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर




'महावतार नृसिंह ' या पौराणिक चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. आता या सिनेमाची रिलीज डेट समोर आली आहे. अश्विन कुमार दिग्दर्शित हा चित्रपट नृसिंह जयंतीच्या दिवशी म्हणजेच २५ जुलै २०२५ प्रदर्शित होणार आहे. नुकतंच या चित्रपटाचा एक नवा व्हिडीओ प्रदर्शित झाला आहे.

ज्यामध्ये भव्य दृश्यांद्वारे एक महाकाव्यात्मक पौराणिक कहाणीचे उत्तम प्रकारे सादरीकरण करण्यात आलं आहे. या चित्रपटाचे निर्माते शिल्पा धवन, कुशल देसाई आणि चैतन्य देसाई आहेत. कलीम प्रोडक्शन्सच्या अंतर्गत त्यांनी हॉम्बले फिल्म्ससोबत मिळून हा चित्रपट तयार केला जा आहे. हा चित्रपट ३ऊ फॉरमॅटमध्ये आणि पाच भारतीय भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

'महावतार' ही एक सिरीज आहे. ज्यामध्ये भगवान विष्णूंच्या विविध अवतारांच्या कथा प्रेक्षकांना पाहता येणार आहेत. 'महावतार नरसिंह' हा हॉम्बले फिल्म्सचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या बॅनरने याआधी घऋक्र उहरींशी १ २, सालार: पार्ट १ - सीजफायर, आणि कांतारा सारखे पॅन-इंडिया ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत.

नृसिंह अवतार हा विष्णूच्या दशावतारांपैकी चौथा अवतार असून, वैशाख शुद्ध चतुर्दशीला हिरण्यकश्यपू या राक्षसाच्या नाशासाठी देवांच्या विनंतीवरून विष्णूंनी हा अवतार घेतला, अशी मान्यता आहे.

भगवान विष्णूचा नृसिंह अवतार प्रकट झाला, म्हणून वैशाख शुद्ध चतुर्दशी ही तिथी नृसिंह जयंती म्हणून साजरी केली जाते.



# बॉबीच्या 'बिच्छू'चा सिक्वल येणार!

१९९२ मध्ये शाहरुख खान आणि ऋषी कपूर यांची मुख्य भूमिका असलेला 'दीवाना' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या माध्यमातून शाहरुखने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्याच्या पहिल्याच चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता या चित्रपटाचा सिक्वल येणार असल्याचे बातमी समोर आली आहे. दीवाना २ या नावाने हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून चित्रपटावर काम देखील करण्यात आल्याचे दीवाना चित्रपटाच्या निर्मात्यांनी स्पष्ट केलं आहे. यासोबतच अभिनेता बॉबी देओल आणि राणी मुखर्जी यांची मुख्य भूमिका असलेला चित्रपट बिच्छू चित्रपटाच्या सिक्वलवर देखील काम करण्यात येणार असल्याची माहिती निर्माते गुड्डू धनोआ यांनी एका वाहिनीशी बोलताना दिली. या दोन्ही चित्रपटांच्या सिक्वलची अधिकृत घोषणा निर्माते गुड्डू धनोआ यांनी केली आहे. गड्डू धनोआ म्हणाले, हो, दीवाना २ बनवला जात आहे. आम्ही सध्या पटकथेच्या टप्प्यात आहोत. याआधी वेब सिरीज प्रदर्शित केली जाणार आहे. यानंतर तो 'दीवाना २' ची निर्मिती सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या सिक्वलमध्ये कलाकारांची नावे फायनल झाली नसल्याचे देखील त्यांनी सांगितले. तसेच बिच्छू चित्रपटाच्या सिक्वलवरही काम केलं जात आहे. या चित्रपटात अभिनेता बॉबी देओल आणि राणी मुखर्जी यांनी अभिनय केला होता. २००० साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या पसंतीची पोचपावती मिळवली होती.



# दीपिकाला वाटते अभिनेत्री केवळ शोभेच्या बाहुल्या

दीपिका पदुकोण सिनेजगतातील सर्वात आघाडीची आणि यशस्वी अभिनेत्री आहे. तिने प्रत्येक सिनेमातून तिचं वेगळेपण दाखवलं आहे. 'पिकू', 'ये जवानी है दिवानी' सारखे सिनेमे असो किंवा 'पठाण','कल्की' सारखे ॲक्शन सिनेमे असो तिने प्रत्येक भूमिकेतून छाप पाडली. आता नुकतंच दीपिकाने सिनेमात अभिनेत्रींना मिळणार्‍या भूमिकांवर भाष्य केलं आहे. आता अभिनेत्री केवळ शोभेच्या बाहुली नसल्याचं तिने म्हटलं आहे. लेकीच्या जन्मानंतर दीपिकाने पहिल्यांदाच फोटोशूट केलं. यावेळी ती म्हणाली,मी काम सुरु केलं तेव्हाच्या भूमिका आणि आजच्या भूमिकांमध्ये खूप फरक आहे. वेगवेगळ्या भूमिका आता समोर येत आहेत. आधी अभिनेत्री म्हणजे केवळ शोभेच्या बाहुल्या म्हणून होत्या, त्यांना थोडी कॉमेडी करण्याची संधी दिली जायची. आज अभिनेत्रींच्या भूमिकांमध्ये एक वेगळा दृष्टिकोन पाहायला मिळतो. त्यांचा वेगळा आवाज आहे जो बदल घडवून आणणारा आहे. मी हा बदल माझ्या करियरमध्ये पाहिला आहे. मी याचा भाग राहिले आहे. भारतीय सिनेमाच्या मुख्य अभिनेत्री मोठा प्रवास करुन इथपर्यंत पोहोचल्या आहेत. बर्‍याच दशकांनंतर हा बदल झाला आहे. मी जे निवडते त्यापासून लोक प्रभावित होतात याची मला जाणीव आहे. दीपिकाने गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात 'दुआ'ला जन्म दिला. लेकीच्या जन्माआधी ती 'कल्कि' आणि 'सिंघम अगेन' सिनेमांमध्ये दिसली. आता ती प्रभाससोबत आगामी 'स्पिरिट' सिनेमात दिसणार आहे. यासाठी तिने तब्बल २० कोटी रुपये घेतल्याची चर्चा आहे.



# 'नो एंट्री २'मधून दिलजीतची माघार

बोनी कपूर यांच्या बहुप्रतीक्षित ड्रीम प्रोजेक्ट 'नो एंट्री'च्या सीक्वेलबद्दल काही काळापासून बरीच चर्चा आहे. अनीस बज्मी दिग्दर्शित या चित्रपटासाठी वरुण धवन, अर्जुन कपूर व दिलजीत दोसांझ यांची नावे पुढे आली होती; परंतु आता बातमी येत आहे की, दिलजीत या प्रोजेक्टमधून बाहेर पडला आहे. दिलजीत दोसांझचे चाहते त्याला 'नो एंट्री २' या कॉमेडी चित्रपटात पाहण्यासाठी खूप उत्सुक होते; पण आता त्याचे चाहते निराश झाले आहेत. कारण- गायक व अभिनेता दोसांझ या प्रोजेक्टमधून बाहेर पडत आहे. रिपोर्टनुसार, दिलजीत दोसांझने 'नो एंट्री २'पासून स्वतःला दूर केले आहे. असे म्हटले जात आहे की, तो या प्रोजेक्टबद्दल खूप उत्साहित होता आणि वरुण धवन-अर्जुन कपूरबरोबर काम करण्यासही तो आनंदी होता; परंतु चित्रपटाच्या क्रिएटिव्ह कल्पनेबद्दल त्याचे मत वेगळे होते. त्यामुळे क्रिएटिव्ह मतभेदांमुळे त्याने चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलजीत आणि चित्रपटाच्या टीममध्ये स्क्रिप्टबाबत अनेक वेळा चर्चा झाली; परंतु तो चित्रपटाच्या कंटेंटवर खूश नव्हता. असेही म्हटले जात आहे की, त्याला त्याचे पात्र मजबूत आणि स्क्रिप्ट चांगली हवी होती. परंतु, ते शक्य झाले नाही, तेव्हा त्याने चित्रपटाला निरोप देणेच योग्य मानले. आता सर्वांत मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, दिलजीत गेल्यानंतर चित्रपटात त्याची जागा कोण घेईल.

चित्रपटाचे निर्माते बोनी कपूर व दिग्दर्शक अनिस बज्मी यांनी अद्याप यावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नसले तरी लवकरच त्याच्या जागी एखाद्या मोठ्या कलाकाराला साइन केले जाईल, असे मानले जाते. विशेष म्हणजे दिलजीत आणि वरुण 'नो एंट्री २'मध्ये एकत्र दिसणार नसले तरी हे दोन्ही कलाकार सनी देओलबरोबर 'बॉर्डर २'मध्ये काम करीत आहेत. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये खूप उत्साह आहे आणि असे मानले जाते की, हा वॉर ड्रामा मोठ्या पातळीवर बनवला जात आहे